नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, दारव्हा द्वारा संचालित (रजी. नं. एफ. १५६२)

# कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरब

ता. दारव्हा जि. यवतमाळ (मवि सांकेतांक ४३४)

(E mail Id – artscomcollegebori@rediffmail.com )

संस्थापक अध्यक्ष
**मा.आ. श्री. माणिकरावजी ठाकरे**

www.accboriarab.org.in
(फोन नं. ०७२३८–२५६३४१/९९२१५५६३६७)

प्राचार्य
**डॉ. केशवराव फाले**
मो. ९९६०४२२७९१

जा.क्र. – कवाम/४३४/............ /२०२०    दिनांक – २७/०१/२०२०

**विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठेचे संस्कार रूजविण्याच्या दृष्टीने रासेयो श्रमसंस्कार शिबिराची महत्त्वाची भूमिका : प्राचार्य डॉ. गजानन जाधव**

**कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरीअरबच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचे उद्घाटन थाटात संपन्न.**

दारव्हा : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत विविध महाविद्यालयांच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरांच्या मालिकेतील कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरीअरबचे विशेष शिबिर दत्तकग्राम जवळगाव येथे आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन श्री. व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगाव राजा येथील प्राचार्य डॉ. गजानन जाधव यांच्या शुभहस्ते पार पडले. याप्रसंगी नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, दारव्हाचे व्यवस्थापक श्री. अशोकराव ठाकरे, कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरीअरबचे व्यवस्थापक श्री. जगन्नाथराव बोरकर, सं.गा.बा.अमरावती विद्यापीठाचे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. दिपक कुटे, जवळगाव ग्रामाचे सरपंच श्री. नितीनभाऊ गुघाणे, गावचे प्रतिष्ठित नागरिक मा. श्री. महादेवरावजी गुघाणे, मा. श्री. सुनीलभाऊ दाढे आदी मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालायाचे प्राचार्य डॉ. केशवराव फाले हे उपस्थित होते.

यानिमित्ताने शिबिरार्थी विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. गजानन जाधव सर यांनी संबोधित केले. विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठेचे संस्कार रूजविण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिराची महत्त्वाची भूमिका आहे. अनेक अर्थाने हे शिबिर संस्कारक्षम बनावे अशी अपेक्षा यावेळी त्यांनी व्यक्त केली. याप्रसंगी उपस्थित सर्व मान्यवरांनी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक आणि ग्रामस्थ मंडळीशी संवाद साधला. सर्व स्वयंसेवकांना शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या.

या उद्घाटणीय कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. नंदकुमार भाकरे यांनी सूत्रसंचालन कु. मयुरी राठोड तर अभार प्रदर्शन प्रा. डॉ. सुजाता नाईक यांनी केले. या कार्यक्रमाकरिता महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

प्रति,
मा. संपादक
दैनिक ..................
यवतमाळ आवृत्ती.

मा. महोदय,

वरील आशयाची बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये प्रकाशित करून उपकृत करावे ही विनंती.

आपला.
प्रा. नंदकुमार गणेशराव भाकरे